INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 7.560 (SJIF 2024)

# महात्मा फुले यांचे सामाजिक विचार आणि आजची प्रासंगिकता

## (Social Thought of Mahatma Phule and its relevance Today)

**डॉ. विठ्ठल सखाराम जाधव**
मार्गदर्शक,
लोकप्रशासन विभागप्रमुख,
कालिकादेवी महाविद्यालय, शिरुर कासार,
ता. शिरुर कासार, जि. बीड

**मिलिंद माणिकराव वाव्हळे**
संशोधक,
म. फुले - डॉ. आंबेडकर विचारधारा,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/05.2024-13131124/IRJHIS2405016

***गोषवारा :***

*१९ व्या शतकात इंग्रजी राजवटीच्या स्थित्यंतरानंतरचा आधुनिक महाराष्ट्र हा समाजसुधारकांचा महाराष्ट्र म्हणून आपण ओळखतो. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये ज्या समाजसुधारकांनी आपले फार मोठे महत्त्वपूर्ण योगदान दिले त्यात महात्मा फुले यांचे स्थान अनन्यसाधारण असे आहे. म. फुले यांनी समाजसुधारक म्हणून केलेले एकूण कार्य, विचार व त्यांचे तत्त्वज्ञान आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत सांस्कृतिकदृष्ट्या फार महत्त्वाचे आहे. 'थॉमस पेन' या महान बंडखोर विचारवंताच्या 'मानवाचे हक्क' या ग्रंथाचा महात्मा फुले यांच्या वैचारिक जडणघडणीवर प्रभाव होता. थॉमस पेन यांच्या वैचारिक प्रभावातूनच महात्मा फुले यांच्या वैचारिक लढ्याची दिशा निश्चित झाली होती. त्यामुळेच तर आधुनिक महाराष्ट्राचे वैचारिक संचित घडविण्यात महात्मा फुले यांचे योगदान अनन्यसाधारण असे आहे. म. फुले यांनी विपुल ग्रंथसंपदा लिहिली. या ग्रंथ लेखनातून त्यांनी मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वंकष सामाजिक क्रांतीचे तत्त्वज्ञान मांडले आहे. त्याचाच प्रामुख्याने या लेखात सामाजिक विचारांच्या आजच्या प्रासंगिकते संदर्भात विचार केला आहे.*

***महत्त्वाचे शब्द :*** *सामाजिक विचार, अखंड, मानवाचा धर्म, अंधश्रद्धा, निर्मिक, सद्गुणी, विद्यार्जन, इंग्रजी भाषा, सत्यवर्तन इ.*

**प्रस्तावना :**

महात्मा फुले यांनी विपुल लेखन केले आहे. त्यात सामाजिक आशयाचे काही अखंड ही लिहिले आहेत. त्यांच्या सामाजिक विचारांच्या परिप्रेक्ष्यात अखंडातून प्रामुख्याने व्यक्त झालेल्या सामाजिक विचारांचाच प्रस्तुत शोधनिबंधात विचार केला आहे. महात्मा फुले यांच्या अंखड लेखनावर तथागत भगवान गौतम बुद्ध, संत कबीर आणि संत तुकारामांच्या वैचारिक तत्त्वज्ञानाचा प्रभाव आढळतो. संत तुकारामांनी आपल्या लेखनातून ज्या पद्धतीने समाजातील कर्मकांड, जाती विषमता, ब्राह्मण्य या बाबींना प्रखरपणे विरोध केला. त्याच पद्धतीने त्यापेक्षा अगदी प्रखरपणे महात्मा

महात्मा फुले यांनी आपल्या सामाजिक आशयाच्या अखंडातून कर्मकांडाचा विरोध केला आहे. या सामाजिक अखंडातून म. फुले यांनी मांडलेला विचार तत्कालीन मानवी जीवन सुधारण्यासाठी तर होताच परंतु आजच्या वर्तमानकाळात व पुढे भविष्यकाळातही त्यांच्या अखंडातील सामाजिक उपदेश व तत्त्वज्ञान समग्र मानवी जातीच्या कल्याणासाठीच होते. त्यामुळेच तर त्यांच्या सामाजिक अखंडातील तत्त्वज्ञान व त्याची आजच्या वर्तमानकाळातील प्रासंगिकता या शोधनिबंधाच्या निमित्ताने समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. म. फुले यांच्या सामाजिक अखंड लेखनाचा अभ्यास करणे.

२. म. फुले यांच्या सामाजिक अखंडातून व्यक्त झालेल्या त्यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे.

३. म. फुलेकालीन सामाजिक, शैक्षण्णिक आणि आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

४. म. फुले यांच्या सामाजिक अखंडाची आजच्या वर्तमानकालीन जीवनात प्रासंगिकता स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने दुय्यम स्त्रोतांवर आधारित असून या संशोधनासाठी विविध प्रकाशित, अप्रकाशित संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, साप्ताहिके, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे.

**महात्मा फुले यांची सामाजिक अखंडरचना :**

महात्मा फुले यांनी इ. स. १८८७ ते १८८९ या कालखंडात जवळपास २५० अखंड विविध विषयांवर लिहिले. या सामाजिक अखंडरचनेतून तत्कालीन समाजाचे वास्तवदर्शी चित्रण त्यांनी केले आहे. या अखंडातून त्यांनी समाजाला उपदेश केला आहे. त्याबरोबरच सर्वंकष क्रांतीचे तत्त्वज्ञान मांडले आहे. महात्मा फुले यांच्या सामाजिक अखंड लेखनाचा हेतू हा प्रामुख्याने जनजागृतीचा होता. महात्मा फुले यांच्या वैचारिक विचारांचे वाहक म्हणून त्यांच्या सामाजिक अखंडरचनेचा विचार आपणास करता येतो.

महात्मा फुले यांच्या सामाजिक अखंडाची निर्मिती ही लोकहितार्थ झालेली आहे. त्यांच्या वैचारिक अधिष्ठानाच्या भूमिकेतूनच त्यांनी सामाजिक अखंडानिर्मिती केली. समाजातील विषमताधिष्ठित चातुर्वर्ण्यावर घणाघाती हल्ला करत स्वातंत्र्य, सामाजिक समता व बंधुभावाचा आग्रही पुरस्कार करणारी वैचारिक मांडणीच महात्मा फुले यांनी त्यांच्या सामाजिक अखंडातून केली आहे.

**महात्मा फुले यांच्या अखंडातील सामाजिक विचार :**

महात्मा फुले यांच्या वैचारिक लेखनातून जसे त्यांचे सामाजिक विचार व्यक्त होतात. तसेच त्यांच्या अंखडलेखनातूनही सामाजिक विचार व्यक्त झाले आहेत. ते पुढीलप्रमाणे -

**'निर्मिक' कल्पना :**

मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीच्या अवस्थेत 'माणूस' ही संकल्पना केंद्रिभूत नव्हतीच तर समग्र मानवी जीवन हे चातुर्वर्ण्य व्यवस्थेत विभागलेले होते. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात झालेल्या वैचारिक मंथनातून,

समाजसुधारणेतून इंग्रजी शिक्षणाच्या अंमलबजावणीमुळे 'माणूस' हा केंद्रस्थानी आला. त्यामुळे माणूस आणि माणूस, माणूस आणि समाज, माणूस आणि विश्व, माणसे आणि निसर्ग अशा नात्यांचा शोध तत्कालीन विचारवंतानी घेतला. त्यामुळेच तर म. फुले यांनी ईशसत्ता नाकारुन 'निर्मिक' संकल्पना आपल्या सामाजिक अखंडातून मांडली ते म्हणतात,

"सर्वांचा निर्मिक आहे एक धनी ।। त्याचे भय मनी ।। धरा सर्व
न्यायाने वस्तूचा उपभोग घ्यावा । आनंद करावा ।। भांडू नये
धर्मराज्य भेद मानवा नसावे । सत्याने वर्तावे ।। ईशासाठी ।।

या सामाजिक अखंडातून म. फुले यांनी सर्व माणसांचा एकच निर्माणकर्ता आहे. या निर्माणकर्त्यानेच प्रत्येकाला मानवी अधिकार दिले आहेत. या मानवी अधिकाराचा उपभोग घेण्यातच सुख आहे. त्यामुळे सर्व माणसांनी परस्परांशी वर्तन करताना बंधुत्वाच्या नात्याने वागावे हेच या अखंडातून त्यांनी स्पष्ट केले आहे.

**अंधश्रद्धेवर टीका :**

महात्मा फुले यांनी आपल्या सामाजिक अखंडातून तत्कालीन समाजव्यवस्थेतील अंधश्रद्धांवर कडाडून टीका केली. या टीकेतूनच त्यांच्या विज्ञानवादी दृष्टीचाही प्रत्यय आपणास येतो. 'मानवाचा धर्म' या अखंडात ते म्हणतात,

"जप अनुष्ठाने स्त्रिया मुलें होती। दुजा कां करिती? मुलांसाठी।
भट ब्रह्मणात बहु स्त्रिया वांझ। अनुष्ठानी बीज। नाही का रे।।
अनुष्ठानावीण विधवा मुले देती। मारुनी टाकिती । सांदी कोणी ।।
ज्यांची जशी कर्मे तशी फळा येती । शिक्षा ती भोगीती । ज्योती म्हणे ।।"

या अखंडातून महात्मा फुले यांनी तत्कालीन समाजजीवनातील अंधश्रद्धेवर कडाडून टीका केली आहे. महात्मा फुले यांचा हा अखंड वाचताना तथागत भगवान बुद्ध व संत तुकारामांच्या विज्ञानवादी विचारांची आठवण होते. म. फुले यांनी उपरोक्त अखंडातून अंधश्रद्धेवर टीकाच केली नाही तर तत्कालीन ब्राह्मण समाजातील ज्वलंत वास्तवावर प्रकाश टाकला आहे. तसेच प्रत्येकाच्या कर्माप्रमाणेच त्याला त्याचे फळ मिळते असाही विचार यातून स्पष्ट केले आहे.

**समता :**

महात्मा फुले यांनी सामाजिक अखंडलेखनातून 'समता' तत्त्वाचा पुरस्कार केलेला आहे. 'मानवाचा धर्म' या अखंडात ते म्हणतात,

"एक सूर्य सर्वा प्रकाशास देतो । उद्योगा लावितो । प्राणीमात्रा ।
मानवासहित प्राण्यांचे जीवन सर्वांचे पोषण । तोच करी ।"

या अखंडाचा विचार करता सूर्य हा सर्वांनाच प्रकाश देतो, सर्व मानव प्राणीसृष्टीचे पोषण करतो, त्याला उद्योगाला लावतो, त्यांच्याकडे भेदाभेद नाही. तो एखाद्याला जवळ व दूर करत नाही. सर्वांना सारख्याच पद्धतीने प्रकाश देतो. त्याचप्रमाणे सर्व मानवांनी सर्वांसोबत सत्याने वागावे. सर्व मानवांचा धर्म एकच असावा. मानवा-मानवात लहान मोठा असा भेदाभेद नसावा. त्यामुळे तर 'समता' या तत्वाचा आग्रही पुरस्कार त्यांच्या लेखनात दिसतो. म. फुले यांच्या अखंडातून समता-बंधुत्वाचा पुरस्कार केलेला आहे.

**विद्यार्जन :**

महात्मा फुले यांनी अस्पृश्य समाजाची अधोगती ही केवळ ज्ञानार्जन न केल्यामुळे अज्ञानीपणामुळे, अंधश्रद्धाळूपणामुळे झाली असे त्यांनी आपल्या अंखडातून सांगितलेले आहे. ते म्हणतात,

''विद्येविना मती गेली । मतिविना नीती गेली ।।

नीतिविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।।

वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।''

या अखंडात मानवाच्या एकूणच दारिद्र्याविषयीचे व्यापक चिंतन त्यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथाच्या उपोद्घातात केले आहे. मानवाच्या अधोगतीचे कारण म्हणजे अविद्या हेच आहे. विद्येच्या अभावामुळेच अज्ञानपणामुळेच माणसांची बुद्धीही कार्य करत नाही. विद्येच्या अभावामुळेच समाजात कसे वागावे? याचेही ज्ञान अस्पृश्य वर्गाला होत नाही. त्यामुळेच त्याच्या जीवनात प्रगतीचे चक्र फिरु शकत नाही. परिणामी मानवाची आर्थिक अधोगती होते व मानवाची प्रगती खुंटते म्हणूनच विद्येचा आग्रही पुरस्कार महात्मा फुले यांनी त्यांच्या अखंडात केला आहे.

**त्रिभाषा सूत्र :**

महात्मा फुले यांनी आपल्या अखंड लेखनात तत्कालीन त्रिभाषासूत्र मांडले आहे. त्यात तत्कालीन स्वभाषा, इंग्रजी भाषा व यवनी भाषा अशा त्रिभाषा सूत्राचा त्यांनी उपदेश केला आहे. आपल्या शैक्षणिक धोरणात कोठारी आयोगाने १९६४ मध्ये मराठी-हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांचा पुरस्कार केलेला आहे. आज तर वर्तमानकालीन इंग्रजी भाषेचाच प्रामुख्याने अधिक प्रभाव सर्वत्र दिसतो. याविषयी महात्मा फुलेंनी त्यांच्या अखंडातच आपले विचार मांडले आहेत. ते म्हणतात,

''इंग्रजी लिहावे भाषण करावे । जगात त्यागावे । व्यसनास ।''

महात्मा फुलेंनी आपल्या अखंडातून इंग्रजी भाषेचा केलेला पुरस्कार येथे केला नाही तर मानवाने आपल्या आयुष्यात आपल्या व्यसनाचा त्यागही करावा असाच उपदेश या अखंडात महात्मा फुलेंनी केला आहे.

**महात्मा फुले यांचे सामाजिक अखंड आणि आजची प्रासंगिकता :**

महात्मा फुले यांचे सामाजिक अखंड लेखन प्रामुख्याने ६ भागात झालेले आहे. यात मानवाचा धर्म एक, मानवी स्त्री-पुरुष, आत्मपरीक्षण, नीती, धीर, समाधान, सहिष्णुता, सद्विवेक, उद्योग, स्वच्छता, गृहकार्यदक्षता, शूद्रातिशूद्रास उपदेश आदि घटकांवर लेखन केले आहे. यातील काही ठळक अखंडाधारे महात्मा फुले यांच्या सामाजिक अखंडाचा या शोधनिबंधात विचार केला आहे. महात्मा फुले यांनी आपल्या सामाजिक अखंडात 'निर्मिक' संकल्पना वापरल्यामुळे पारंपरिक ईश्वरी सत्तेला त्यांनी झुगारले आहे. त्यामुळेच आपोआपच त्यांच्या लेखनात विज्ञानवाद दिसून येतो. हा विज्ञानवादी दृष्टिकोन नवभारताच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. महात्मा फुले यांनी अंधश्रद्धेवर कडाडून टीका केली आहे. त्यामुळेच समाजातील भोंदू बाबांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे मानवाची भोंदू बाबांकडून होणारी लूट ही काही प्रमाणात थांबलेली आहे. त्यामुळेच तर या अखंडाची प्रासंगिकता कालातीत आहे. आजच्या वर्तमानात इंग्रजी भाषेचा पुरस्कार शासनाने केल्यामुळेच महात्मा फुलेची दूरदृष्टी कशी होती? हेच या अखंडातून स्पष्ट होते.

इंग्रजी भाषा हीच माणसाच्या प्रगतीसाठी अति आवश्यक झाली आहे. 'समता' या तत्त्वाचा आग्रही पुरस्कार महात्मा फुले यांनी आपल्या अखंडात केला आहे. समतेचे तत्त्व मानवाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळेच भविष्यात समाजात सर्वत्र समता पाहावयास मिळू शकते असाच आशावाद या निमित्ताने व्यक्त होतो. महात्मा फुले यांच्या विचारांची प्रासंगिकता पाहताना बाबा आढाव म्हणतात, "मानवी बुद्धीचे स्वातंत्र्य, प्रेम, समता, बंधुभाव, श्रमप्रतिष्ठा, सारासार विवेक या मूल्यांवर आधारलेल्या नव्या संस्कृतीचे उद्गान फुल्यांनी केले आणि सामाजिक व आर्थिक शोषण, व्यवस्थेविरुद्ध, गुलामगिरीविरुद्ध सत्यशोधनाचे आंदोलन सुरु केले. त्यांची कविता सांस्कृतिक बंडखोरी करण्यासाठी जन्मली हे लक्षात घेतले पाहिले. जोतिरावांच्या कवितेचे 'घराणेच' निराळे आहे." बाबा आढाव यांनी त्यांच्या मतात महात्मा फुले यांच्या एकूणच अखंडरचनेचे सारच स्पष्ट केले आहे.

**निष्कर्ष :**

१. म. फुले यांच्या सामाजिक अखंडरचनेची प्रेरणा ही तत्कालीन समाजात जनजागृती करणे ही होती.

२. महात्मा फुले यांच्या सामाजिक अखंडातून विषमताधिष्ठित चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर घणाघाती हल्ला त्यांनी केला आहे. तसेच समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा यावर कठोर शब्दांत भाष्य केले आहे. त्यामुळे या अखंड परंपरेमागे तथागत भगवान गौतम बुद्ध, संत कबीर, संत तुकाराम यांचे विज्ञानवादी वैचारिक अधिष्ठान आहे.

३. महात्मा फुले यांच्या सामाजिक अखंडातून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही मूल्ये व्यक्त होतात.

४. महात्मा फुले यांच्या सामाजिक अखंडातून इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे.

५. मानवी जीवनाची अधोगती ही मानवाच्या अज्ञानीपणामुळे झालेली आहे. त्यामुळेच त्यांची प्रगती खुंटली आहे व प्रगतीचे हे चक्र पुनरुज्जीवित करावयाचे असेल तर त्याने विद्यार्जन करणे महत्त्वाचे आहे.

६. आधुनिक महाराष्ट्राच्याच नाही तर एकूण देशाच्या वैचारिक जडणघडणीत महात्मा फुले यांचे योगदान अनन्यसाधारण असेच आहे. त्यामुळेच तर त्यांच्या विचारांची वैचारिक प्रकाशमानता दीर्घकाळ राहिल हे मात्र नक्की!

**संदर्भ सूची :**

१. फडके य. दि. (संपा.), (१९९१), मुंबई, महात्मा फुले समग्र वाङ्मय, मुंबई, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

२. नरके हरि (संपा.), (२००५), महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू व चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन

३. नरके हरि (संपा.), (२००६) मुंबई, महात्मा फुले गौरव ग्रंथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन

४. तायडे पुष्पा (संपा.), (२०२१), क्रांतिरत्न महाग्रंथ, अकोला, ग्रॅव्हिटी पब्लिकेशन.